अंबरनाथ वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २७५ /२०२५ दि १७ /१२/२०२५

–: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

ज्याअर्थी, अंबरनाथ वाहतूक उपविभागाचे हद्दीत स्थानिक स्वराज्य संस्था कुळगाव बदलापुर नगरपरिषद निवडणुक २०२५ चा दिनांक २१/१२/२०२५ रोजी निकाल असुन अंबरनाथ, बदलापुर शहरामध्ये अवजड वाहनांची वर्दळ जास्त असते तसेच कर्जत वांगणी मधुन कल्याण कडे जाणारे शहरातील मुख्य रोडवर आमदार मिसळ ते जुनी नगरपरिषद कार्यालय रोडवरील आदर्श विद्यालय येथे स्थानिक स्वराज्य संस्था कुळगाव बदलापुर नगरपरिषद मतदार संघाचे स्ट्रॉंग रूम आहे. मतमोजणीच्या दिवशी स्ट्रॉंग रूमचे ठिकाणी उमेदवार तसेच त्यांच्या सोबत कार्यकर्त्यांची मोठया प्रमाणात गर्दी होणार असल्याने वाहतुक कोंडी न होण्यासाठी पर्याय म्हणुन शहरामधुन जाणारी सर्व प्रकारची वाहने मोटर सायकल, रिक्षा तसेच छोटी चारचाकी व जड अवजड वाहने ही शहराच्या बाहेरच्या रस्त्याने वळवुन सुरळीत ही शहराच्या बाहेरच्या रस्त्याने वाहने वळण्यात येणार असल्याने सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम. व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढील प्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे:–

प्रवेश बंद–	**१)** कर्जत कडुन बदलापुर शहरात येणाऱ्या अवजड वाहनांना **होप इंडीया (हिराजी गोमाजी पाटील प्रवेशद्वार)** या ठिकाणी **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने होप इंडीया (हिराजी गोमाजी पाटील प्रवेशद्वार) येथुन डावे बाजुला वळण घेवुन पुढे पाण्याची टाकी मार्गे, डी.जी.१, घोरपडे चौक मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**२)** कर्जत कडुन गांधी चौक रोडने बदलापुर शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **आमदार मिसळ** या ठिकाणी **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने आमदार मिसळ येथुन म्हाडा कॉलनी मार्गे डी.जी १ मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**३)** अंबरनाथ व बदलापुर पश्चिम येथुन कुळगाव बदलापुर जुनी नगरपरिद समोरून आदर्श शाळेच्या दिशेने जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **जुनी कुळगाव बदलापुर नगरपरिषद समोर ''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने कुळगाव बदलापुर जुनी नगरपरिषद येथुन उजवीकडे वळण घेवुन डी.जी १ मार्गे इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**४)** अंबरनाथ, बदलापुर पश्चिम तसेच वैशाली टॉकीज येथुन बदलापुर पुर्वेला जाणाऱ्या अवजड वाहनांना **साईकृपा हॉस्पीटल समोर वीर सावरकर पुल** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने वीर सावरकर पुल येथुन उजवीकडे वळण घेवुन दत्त चौक, शंकर मंदिर टि पॉईट, फॉरेस्ट नाका येथुन डावे बाजुला वळण घेवुन टि पॉईट मार्गे ईच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद–	**५)** मुरबाड कडुन एरंजाड मार्गे बदलापुर शहरात येणाऱ्या अवजड वाहनांना **शंकर मंदिर टि पॉईट** येथे **''प्रवेश बंद''** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग–	सदरची वाहने शंकर मंदिर टि पॉईट येथुन उजवे बाजुला वळण घेवुन पुढे फॉरेस्ट नाका येथुन डावे बाजुला वळण घेवुन टि पॉईट मार्गे ईच्छीत स्थळी जातील.

सदरची वाहतूक नियंत्रण अधिसुचना ही दिनांक २१/१२/२०२५ रोजी सकाळी ०६:०० पासुन ते रात्रौ २०:०० वा. पावेतो अंमलात राहील.

सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका व निवडणुकीची वाहने तसेच इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतुक विभाग, ठाणे शहर

प्रति,

जिल्हा प्रसिध्दी अधिकारी, ठाणे

२/– सदरची अधिसुचनेस प्रसिध्दी देणेस विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर

मा.पोलीस आयुक्त,ठाणे शहर

मा.पोलीस सह आयुक्त,ठाणे शहर

मा.अपर पोलीस आयुक्त, पुर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.

मा.आयुक्त, उल्हासनगर महानगरपालिका, उल्हासनगर.

मा.जिल्हाधिकारी, ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी.

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–४ उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

प्रत:– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष,ठाणे

२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– सपोआ वाहतूक विभाग, उल्हासनगर व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.

२/– म.न.पा.उल्हासनगर च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक ठिकाणी सुचना फलक लावून घ्यावीत.